बीड । शनिवार
१७.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ४६
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# मराठा आरक्षण : सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर अवघ्या २४ तासांतच अंमलबजावणी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील मराठा समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन व आमरण उपोषण केले. त्यामुळे गेल्या काही दिवसापासून मराठा आरक्षणाच्या मुद्दयावरून राज्यातील वातावरण चंगलेच टपले आहे. त्यातच आता मराठा आरक्षणावर मोठी अपडेट येत आहे.

सुप्रीम कोर्टाचे नवनियुक्त सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी दिलेल्या आदेशानंतर २४ तासांतच मराठा आरक्षण संदर्भातील याचिकांवरील सुनावणीसाठी विशेष खंडपीठ स्थापन करण्यात आले आहे. सुप्रीम कोर्टाने महत्त्वपूर्ण निर्देश दिल्यानंतर नव्याने विशेष खंडपीठ स्थापन करण्यात आल्याने येत्या काळात मराठा आरक्षणाचा मुद्दा लवकरच मार्गी लागण्याची शक्यता आहे.




सुप्रीम कोर्टाच्या सरन्यायाधीश पदाचा पदभार गुरुवारी हाती घेताच सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी मराठा आरक्षणासंदर्भात आदेश दिले होते. त्यांनी मराठा आरक्षण संदर्भात उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना नवीन खंडपीठ स्थापन करून जलद निर्णय देण्याचे आदेश दिले होते. सरन्यायाधीश गवई यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने याबाबत आदेश दिल्यानंतर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आलोक आराधे यांनी मराठा आरक्षणाच्या याचिकांवरील सुनावणीसाठी विशेष खंडपीठ स्थापन केले आहे. अवघ्या २४ तासातच आदेशाची अंमलबाजवणी करीत याबाबतची नोटीस उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली.

राज्य सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवरील सुनावणीसाठी न्या. रवींद्र घुगे, न्या. संदीप मारणे, न्या. निजामुद्दीन जमादार यांचे विशेष पूर्णपीठ स्थापन करण्यात आले आहे. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने याबाबत आदेश दिल्यानंतर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आलोक आराधे यांनी खंडपीठाची स्थापना केली आहे. खंडपीठाची स्थापना करण्यात आल्याने येत्या काळात लवकरच सुनावणीला सुरुवात होणार असल्याने हा मुद्दा लवकरच निकाली लागण्याची शक्यता असल्याने सर्वांचे त्याकडे लक्ष लागले आहे.

या बाबतची नोटीस सुप्रीम कोर्टाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. या नोटिशीत या प्रकरणाची सुनावणी कधी सुरु होणार याबाबत माहिती देण्यात

▶▶ उर्वरित पान २ वर

# निवडणुका घेण्यात मान्सूनची अडचण, आयोगाकडून मुदतवाढ मागून घेऊ

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे । प्रतिनिधीं**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांमध्ये घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. परंतु महायुती सरकार त्यासाठी सक्षम नसल्याचे दिसून येत आहे. मान्सूनमुळे निवडणुका घेण्यात अडचण येऊ शकते, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. मुसळधार पाऊस असेल अशा ठिकाणच्या निवडणुका १५-२० दिवस लांबणीवर टाकाव्या लागू शकतात आणि त्यासाठी निवडणूक



आयोगाकडे एक्स्टेन्शन मागितले जाईल असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पुणे येथे देवेंद्र फडणवीस यांनी आज प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना आगामी निवडणुकांबाबत भाष्य केले. निवडणुका वेळेवर होण्यासाठी कोणतीही अडचण नसल्याचा दावा त्यांनी केला; परंतु पावसामुळे काही ठिकाणच्या निवडणुकांना एक्स्टेंशन घ्यावे लागेल, असे ते म्हणाले. सरकार आणि निवडणूक आयोगाने निवडणुकांसाठी आवश्यक गोष्टींची तयारी सुरू केली असल्याचे त्यांनी सांगितले. महापालिकांची प्रभाग रचना करा; निवडणूक आयोगाची राज्य सरकारला सूचना राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकांच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# पुण्यातील वन विभागाची ३० एकर जमीन बिल्डरला देण्याचा २७ वर्षांपूर्वीचा निर्णय रद्द

## सरन्यायाधीश गवईंचा पहिला निकाल, नारायण राणेंना झटका

**पुणे । प्रतिनिधीं**

देशाचे ५२वे सरन्यायाधीश म्हणून बुधवारी शपथ घेतल्यानंतर भूषण गवई यांनी आज सरन्यायाधीशांच्या खुर्चीतून पहिला निकाल पुण्यातील वनजमिनीबाबत दिला. वनविभागाची ही शेकडो कोटी रुपयांची ३० एकर जमीन महसूल मंत्री असताना नारायण राणे यांनी बिल्डरला



देण्याचा निर्णय स्वतःच्या अधिकारात घेतला होता. राणे यांनी घेतलेला हा निर्णय रद्द करत सरन्यायाधीशांनी झटका दिला व ही जमीन पुन्हा वन विभागाकडे सोपवण्याचे आदेश दिले. पुण्यातील कोंढवा भागातील ही ३० एकर जमीन वन विभागाची असताना ही आपली शेतजमीन

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या "सहकार संकुल" बांधकामास ना. अजितदादा पवार यांच्याकडुन हिरवा कंदिल

## आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नाला यश

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील जालना रोड परिसरात मुख्य रस्त्यालगत सहकार विभागाचा भुखंड मागील अनेक वर्षापासुन बांधकामाच्या प्रतिक्षेत आहे. या भुखंडावर सहकार विभागातील सर्व कार्यालयांसाठी एकत्रित प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करुन बीड शहराच्या वैभवात भर घालील अशी आकर्षक व देखणी वास्तु उभारावी अशी मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री तथा



बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्याकडे केली होती. ना. अजितदादा पवार यांनी सहकार संकुलाच्या बांधकामास हिरवा कंदिल दाखविला असुन प्रशासनाला या बाबतचे आदेश दिले आहेत. इमारत बांधकामाचा आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य वास्तु शास्त्रज्ञाकडुन तयार करण्याचे निर्देश प्रशासनाला मिळाले आहेत. पालकमंत्री म्हणुन बीड जिल्ह्यासाठी सहकार संकुलाची प्रशासकीय इमारत ना. अजितदादा पवार यांच्या माध्यमातुन आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नातुन मिळणार आहे.

बीड शहरातील जालना रोड परिसरात मुख्य रस्त्यालगत सर्व्हे नंबर १७९९ मध्ये सहकार आयुक्त यांच्या नावाने १५१५.९४ चौरस

▶▶ उर्वरित पान २ वर

# उपसभापती डॉ. निलमताई गोऱ्हे यांच्याकडून अँड. संगिताताई चव्हाण यांना भेट

## अहिल्यानगर येथे तब्येतीविषयी आस्थेवाईकपणे विचारपूस

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलमताई गोऱ्हे यांनी अँड. संगिताताई चव्हाण यांची आज अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली. अहिल्यानगर - पुणे महामार्गावरील अपघातात जखमी झालेल्या शिवसेना संपर्कप्रमुख तथा महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या सदस्य अँड. संगिताताई चव्हाण यांच्यावर अहिल्यानगर येथील शासकीय



रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांच्यावर झालेल्या शस्त्रक्रियेनंतर महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलमताई गोऱ्हे यांनी आज अहिल्यानगर दौऱ्यावर असताना

▶▶ उर्वरित पान २ वर

# राज्यातील बड्या पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील बड्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. मुंबई, पुण्यासहित राज्यातील विविध जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीपूर्वीच पोलीस प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. यात शैलेश बलकवडे. ए. एच. चावरिया यांच्यासहित अनेक बड्या पोलीस अधिकाऱ्यांचा





नावाचा समावेश आहे.

**● कुणाची कुठे बदली ?**

ए.एच. चावरिया यांची अमरावती शहराचे नवीन पोलिस आयुक्त म्हणून बदली. पुणे पोलिस गुन्हे ▶▶ उर्वरित पान २ वर

# चेहरा आणि गुण एकदम सेम टू सेम! आष्टीच्या जुळ्या बहिणींना दहावीच्या परीक्षेत एक सारखे गुण



**आष्टी । प्रतिनिधी**

१३ मे रोजी महाराष्ट्र बोर्डाच्या दहावी इयत्तेचा निकाल जाहीर झाला असून यात राज्याचा निकाल ९४ टक्के लागला आहे. राज्यातील अनेक मुलं मुलींना या परीक्षेत घवघवीत यश मिळालं असून काही विद्यार्थ्यांनी तर १०० पैकी १०० मार्क सुद्धा मिळवले आहेत. परीक्षेत चांगले गुण मिळवलेल्या दहावीच्या विद्यार्थ्यांच्या यशोगाथा ऐकायला मिळत असताना आता बीडच्या जुळ्या बहिणींनी दहावीच्या परीक्षेत मिळवलेल्या यशाची सुद्धा बरीच चर्चा रंगतेय. बीड जिल्ह्यातील आष्टी येथील धीरज देशपांडे

▶▶ उर्वरित पान २ वर




# केज मध्ये भरधाव कंटेनरने एकास चिरडले

## ८ ते १० गाड्यांना धडक; संतप्त जमावाने कंटेनर जाळला

**केज । प्रतिनिधी**

बीड कडून भरधाव वेगात निघालेल्या एका कंटेनरने सात ते आठ वाहनाना धडक देऊन चिरडल्याची व यात एक महि तर २० ते २५ जण जखमी झाल्याची दुर्देवी घटना आज दुपारी केज मध्ये घडली असून घटनास्थळाहून फरार झालेला कंट पुढे लोखंडी

याविषयी प्राप्त माहिती अशी की आज दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास बीड कडून भरधाव वेगात



नेकनूर मार्गे केज मध् आलेल्या डीडी ०१ - झेड ९७ ७१ क्रमांकाच्या कंटेनर ने सर्वप्रथम नेकनूर येथे काही जणांना चिरडले व त्यानंतर केज मधील अनिल पासून पुढे सात ते आठ वाहनांना चिरडत व पुढे काही वाहनांना फरपटत नेऊन सदर कंटेनर आंबेजोगाईच्या दिशेने फरार झाला प्राथमिक माहितीनुसार यामध्ये एक महिला ठार तर २० ते २५ जण जखमी झाले असून यातील आठ ते दहा गंभजखमीला आंबेजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात हलवण्यात आल्याचे वृत्त असून आज केज शहरात आठवडी बाजा असल्याने रस्त्यावर तोबा गर्दी असताना ▶▶ उर्वरित पान २ वर

# वीज आणि तिचं कोसळणं..

नेमेची येतो पावसाळा.. अशी एक उक्ती आहे. मात्र ग्रीष्मात तापलेल्या मातीला आणि होरपळलेल्या वनसंपत्तीसह प्रत्येक सजीवाला याची आस असते आणि असा हा पावसाळा आता उंबरठ्यापर्यंत आलाय. आपण मौसमी हवामानाच्या प्रदेशात राहतो आणि शेतीचा आपला प्रमुख व्यवसाय देखील या पावसावरच अवलंबून असतो तथापि पाऊस जसा दिलासा घेऊन येतो.. चराचरात नवचैतन्य भरतो तसा तो आपत्ती देखील आणतो त्याही पद्धतीने आपण सज्ज व्हायला लागेल.

पाऊस आणि आपत्ती याचंही नातं आहे. ज्याला आपण आपत्ती म्हणतो अशा त्या नैसर्गिक आपत्तीबाबत आपण माहिती घेण आणि त्यापासून किमान प्राणहानी होणार नाही याची खबरदारी घेणं आवश्यक आहे.

पाऊस येतो तो मृग नक्षत्रापासून परंतु त्याची चाहूल आपल्याला रोहिणी नक्षत्रात लागते कारण हा मान्सून पूर्व पावसाचा काळ असतो या काळात वातावरण तापलेले असल्याने वादळी वारे, विजांचा कडकडाट यासह कोसळणे आदी आपत्ती समोर येतात. आपण यासाठी तयार नसल्यास याचा फटका जरूर बसतो. वीज आकाशात तयार होणं आणि ती जमिनीवर पडणं या मागचं विज्ञान आपण बघूयात,आपण



सर्व जण बॅटरी वापरतो तशा नैसर्गिक बॅटरीचा प्रकार आकाशात निर्माण होत असतो. जमीन तापते त्यावेळी जमिनीवरील गरम हवा वरच्या दिशेने जायला सुरुवात होते आणि तिचा आकाशातील ढगांची संपर्क होतो.

आकाशात असलेल्या ढगांमध्ये बर्फाचे कण असतात ते यावेळी (+) धन प्रभारीत असतात तर जाणाऱ्या हवेतील कणांमध्ये (-) ऋण प्रभार असतो या संपर्कातून प्रचंड अशा क्षमतेची ऊर्जा निर्माण होते ती म्हणजे वीज होय.

याचा आणखी एक प्रभार आकाशातच असतो. आधिक उंचीचे ढग असतील तर त्या ढगाच्या वरील बाजूस (+) धन प्रभार आणि खालील बाजूस (-) ऋण प्रभार अशी स्थिती असते. वाऱ्यामुळे हे ढग एकमेकांना धडकतात त्यावेळी या प्रभारामुळे देखील वीज निर्माण होते.

सर्वसाधारणपणे वीज तयार झाल्यावर ती एका ढगातून दुसऱ्या ढगाकडे फेकली जाते अशावेळी प्रचंड आवाज आणि प्रकाश दोन्ही तयार होतो ज्याला आपण ढगांचा कडकडाट आणि विजांचा लखलखाट अर्थात वीज चमकणे असे म्हणतो.

ही वीज ज्यावेळी जमिनीकडे अर्थात ऋण भाराकडे खेचली जाते त्यावेळी ती प्रचंड ऊर्जा आणि गतीने जमिनीकडे झेपावते आणि नजीकच्या प्रथम स्पर्शी उंच टोकावर आढळते याला वीज पडणे असे म्हणतात.

प्रति तास ३ लाख किलोमीटर, म्हणजेच प्रतिसेकंद ८० ते ८५ किलोमीटर गतीने ऊर्जा असणारा हा विजेचा लोळ १५० मीटर अंतरापर्यंत खाली जमिनी जवळ आल्यास नजीकच्या उंच इमारत व इतर वस्तूंवर पडते प्रसंगी याचा प्रवाह १०० कोटी होल्टस् इतका प्रचंड असू शकतो. अशा प्रकारच्या १०० विजा प्रतिसेकंद जमिनीवर पडतात आणि पावसाळ्यात याचे प्रमाण वाढते म्हणून ही नैसर्गिक आपत्ती प्राण घातक ठरते.

काळजी/ प्रतिबंध हाच उपाय

विज ही प्राणघातक ठरू नये यासाठी काही गोष्टी जरूर करा.

विजा चमकत असतील तर घराबाहेर जाऊ नका शक्यतो घरातच रहा

झाडाखाली आश्रय हा सर्वाधिक चुकीचा उपाय आहे. झाडावर वीज कोसळून आपल्याकडे सर्वाधिक मृत्यू होतात. विजा चमकत असतील तर झाडाच्या आसरा घेऊ नका. उंच जागांचा आश्रय देखील टाळा.

शेतात असाल तर जमिनीवर डोकं टेकवून कानावर हात ठेवून जमिनीशी कमीत कमी संपर्क येईल अशा स्थितीत बसा.

सध्याच्या वापरातील मोबाईल तसेच घरातील टी.व्ही, रेडिओ आणि वीज उपकरणे यापासून दूर राहा.

धरणं, तलाव अशा पाणी साठ्यात वीज पडण्याची अधिक शक्यता असते त्यामुळे अशा ठिकाणांपासून दूर राहा.

जंगलात भटकंती करीत असताना विजा चमकत असतील तर कमी उंचीच्या झाडाचा आसरा घ्या, या स्थितीत वीज पडल्यास उंच झाडावर पडेल व तुमचे प्राण वाचू शकते.

वीज प्राण घातक आहे आणि त्यापासून बचाव सर्वोत्तम उपाय आहे. अद्याप पावसाळा सुरू झालेला नाही तरी १ मार्च ते १५ एप्रिल २०२५ या कालावधी देशात वीज कोसळल्याने १६२ जणांना प्राण गमवावे लागले आहेत.

निसर्गाच्या शक्तीचा आदर केलाच पाहिजे हे देखील स्पष्टच आहे.

**– प्रशांत विजया अनंत दैठणकर**
**( जिल्हा माहिती अधिकारी ) बीड**

# आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी सुरक्षित, सज्ज रहावे- नागरिक संरक्षण संचालनालयाचे आवाहन

ठल्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी सुरक्षित, सज्ज आणि जागरूक रहावे, असे आवाहन नागरिक संरक्षण संचालनालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

अशा परिस्थितीत नागरिकांनी अधिकृत सरकारी चॅनेल्स (टीव्ही, रेडिओ, खात्रीशीर सोशल मीडिया, स्थानिक प्रशासन) यांच्याकडूनच माहिती घेऊन सतर्क रहावे. परिस्थिती अशांत होईल अशा अफवा किंवा अनधिकृत माहिती पसरवू नये. आपत्कालीन परिस्थितीत टॉर्च, बॅटऱ्या, मेणबत्त्या, प्राथमिक उपचार किट व आवश्यक औषधे, पाणी (किमान ३ दिवस पुरेसे) व टिकाऊ अन्न, मोबाईल चार्जर आणि पॉवर बँक, वैध ओळखपत्रे व आवश्यक रोख रक्कम, महत्त्वाच्या संपर्क क्रमांकांची यादी आदी आवश्यक वस्तू तयार ठेवाव्या.

मूलभूत सुरक्षा नियम- आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी जवळचे आश्रयस्थान, बंकर किंवा इव्हॅकेशन प्लेसेस, घरातील सुरक्षित जागा (खिडक्यांशिवाय असलेली खोली) तसेच लाइट्स आउट किंवा ब्लॅकआउट सूचनांचे पालन करावे. हवाई हल्ला किंवा क्षेपणास्त्र अलर्ट आल्यास ताबडतोब घरात रहावे; सुरक्षित, ठिकाणी आश्रय घ्यावा. खाली बसून डोकं झाकावे, खिडक्यांपासून दूर रहावे, दिवे बंद व खिडक्यांवर जाड पडदे ठेवावे, सायरन काळात लिफ्टचा वापर टाळून जिन्यांचा




वापर करावा. तसेच दिव्यांग व लहान मुले व वृद्ध व्यक्ती, आजारी व्यक्ती आणि पाळीव प्राण्यांची काळजी घ्यावी. नागरी संरक्षण स्वयंसेवक, स्थानिक पोलीस किंवा सुरक्षा कर्मचा-यांनी दिलेल्या सूचना पाळाव्या. अनावश्यक प्रवास टाळावा. वाहतूक नियमांचे पालन करावे. सार्वजनिक वाहतुकीवर निर्बंध लागू असल्यास पर्यायी मार्गाबाबत माहिती घ्यावी.

संवेदनशील माहिती (सैन्य हालचाली, महत्त्वाचे ठिकाणे) कुणाशी शेअर करू नका. संशयास्पद लिंक किंवा मेसेजवर क्लिक करू नका किंवा पुढे पाठवू नका. आपत्कालीन परिस्थितीत नेटवर्क फ्रि ठेवण्यासाठी संवाद मर्यादित ठेवावा. घाबरल्याने गोंधळ निर्माण होतो- शांत राहा व इतरांनाही माहिती द्या व मदत करावी. कर्फ्यू, हालचाल निर्बंध व आपत्कालीन आदेश पाळून स्थानिक प्रशासनाला मदत करावी. आपली जागरूकता, शिस्त व एकात्मता राष्ट्रीय सुरक्षेसाठी अत्यावश्यक आहे त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी सज्ज असावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

आपत्कालीन संपर्क क्रमांक- आपत्ती व्यवस्थापन विभाग मदत कक्ष : १०७०/१९१६/९३२१५८७१४३, मुंबई पोलिस - १०० / ११२, मुंबई अग्निशमन केंद्र - १०१, २३०८५९९२, रुग्णवाहीका - १०८, महिला मदत कक्ष - १०३, अल्पवयीन मुलांकरिता मदत कक्ष - १०९८, वन विभाग - १९२६, गॅस गळती मदत कक्ष (ड्झत्र्) - १९०६, बेस्ट पॉवर (शहर) ८८२८८३०२८८, ९९३०९०११९३, अदाणी एनर्जी (पश्चिम उपनगरे आणि पूर्व उपनगरांचा काही भाग) ५०५४९१११, ५०५४७२२५,

पान १ वरून पुढे...

## मराठा आरक्षण...

आलेली नाही. परंतु, येत्या काळात लवकरच याबाबत घोषणा करण्यात येणार असल्याचे समजते. त्यामुळे आता या प्रकरणाची सुनावणी कधी सुरू होणार याकडे लक्ष लागले आहे.

## निवडणुका घेण्यात...

पार्श्वभूमीवर सरकारला काल एक पत्र दिले. निवडणुकांसाठी प्रभाग रचना करण्याच्या सूचना आयोगाने सरकारला दिल्या आहेत. प्रत्येक निवडणुकीपूर्वी तयारीच्या दृष्टीने तशा सूचना द्याव्या लागतात असे निवडणूक आयोगाचे अधिकारी जगदीश मोरे यांनी सांगितले.

## पुण्यातील वन...

असल्याचा दावा चव्हाण नावाच्या व्यक्तीने केला होता. त्यानंतर १९९८ साली तत्कालीन महसूलमंत्री नारायण राणे यांनी स्वतःच्या अधिकारात ही वनजमीन चव्हाण नावाच्या व्यक्तीला दिली. मात्र जमीन ताब्यात येताच चव्हाण यांनी ही जमीन रिची रीच या सहकारी संस्थेला २ कोटी रुपयांना विकली. धक्कादायक म्हणजे काही दिवसांतच पुण्याचे तत्कालीन विभागीय आयुक्त राजीव अग्रवाल, जिल्हाधिकारी विजय माथनकर आणि उप वनसंरक्षक अशोक खडसे यांनी ही ३० एकर जमीन बिगरशेती असल्याचे प्रमाणपत्र दिले. त्यामुळे या जागेवर बांधकाम करण्याचा मार्ग मोकळा झाला होता. रिची रीच सोसायटी या जमिनींवर निवासी संकुल, क्लब हाऊसेस, रो हाऊसेस आणि शॉपिंग कॉम्प्लेक्सचा प्रकल्प उभारणार होते. रिची रीच सोसायटीची स्थापना सीटी ग्रुपचे अनिरुद्ध देशपांडे, ऑक्सफर्ड प्रॉपर्टीज आणि रहेजा बिल्डर्स यांनी एकत्र येऊन केली होती. मात्र या निर्णयाच्या विरोधात पुण्यातील नागरी चेतना मंचने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आणि याचिका दाखल केली. सर्वोच्च न्यायालयाने २००२ मध्ये या प्रकरणाच्या तपासासाठी सेंट्रली एम्पॉवर्ड कमिटीची (सीईसी) स्थापना केली. या समितीने पुण्यातील या जमिनीला भेट दिली आणि सर्वोच्च न्यायालयाला अहवाल सादर केला. या अहवालामध्ये नारायण राणे यांच्यासह संबंधित अधिकारयांवर कडक कारवाई करण्याची शिफारस करण्यात आली होती. मात्र या प्रकरणात केवळ वन विभागाचे उपवनसंरक्षक अशोक खडसे यांच्यावर गुन्हा दाखल झाला. न्यायालयीन लढाईमुळे या जमिनीवर बांधकाम झाले नाही. परंतु रिची रीच सोसायटीने ही जागा बिगरशेती असल्याचा दावा करीत राज्याच्या पुरातत्व विभागाच्या कार्यालयातील रेकॉर्ड पुरावा म्हणून २०२३ मध्ये सादर केले. मात्र वन विभागाला याबाबत शंका आली. पुरातत्व विभागाच्या रेकॉर्डमध्ये फेरफार केल्याचे आढळून आले. त्यानंतर या प्रकरणाचा तपास जानेवारी २०२४ मध्ये सीआयडीकडे सोपविण्यात आला. वन विभागाने सर्वोच्च न्यायालयात या सर्व गोष्टी निदर्शनास आणून दिल्या. दरम्यान, आज सरन्यायाधीश भूषण गवई यांनी वन विभागाला ही जागा परत करण्याचे आदेश दिले आहेत.

- वन विभागाची ही ३० एकर जमीन बिल्डरता देण्याचा निर्णय म्हणजे मंत्री, प्रशासकीय अधिकारी खासगी बिल्डरसोबत कशी मिलिभगत करतात याचे ढळढळीत उदाहरण असल्याचे ताशेरे यावेळी सरन्यायाधीषा गवई यांनी ओढले.

देशभरातील वनजमिनींना आदेश लागू- भूषण गवई यांच्यासह तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने हा निकाल देताना देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना स्पष्ट आदेशही दिले. अशाप्रकारे वन विभागाच्या जमिनी हडप केल्या गेल्या असतील तर त्याचा तपास करा आणि या जमिनी एक वर्षाच्या आत पुन्हा सरकारजमा करून घ्या असे नमूद करतानाच, एखाद्या जमिनीवर बांधकाम उभे राहिल्याने जमीन परत घेणे शक्य नसेल तर बाजारभावाप्रमाणे मोबदला वसूल केला जावा, असेही न्यायालयाने आदेशात म्हटले आहे.

## बीड शहराच्या...

मिटर आकारमानाचा भुखंड आहे. या शासकीय भुखंडावर सहकार विभागातील प्रशासकीय कार्यालयांसाठी सहकार संकुलाच्या इमारतीचे बांधकाम प्रस्तावित होते. शहरातील काही व्यापाऱ्यांनी खाजगी प्रयोजनासाठी या जागेची मागणी शासनाकडे केली होती. आ. विजयसिंह पंडित यांनी या जागेवर सहकार विभागातील प्रशासकीय कार्यालयांसाठी सहकार संकुलाचे बांधकाम व्हावे यासाठी पाठपुरावा व प्रयत्न केले. ना. अजितदादा पवार यांच्या पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात बीड शहराच्या वैभवात भर पाडेल अशी आकर्षक वास्तु निर्माण करण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी ना. अजितदादा पवार यांना साकडे घातले. आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीला त्यांनी हिरवा कंदिल दाखवत सहकार संकुलाच्या बांधकामास मान्यता दिली आहे.

जिल्हा उपनिबंधक, सहाय्यक निबंधक, देखरेख संघ यासह सहकार विभागातील लेखा परिक्षण विभागाची कार्यालये आणि सहकार विभागाशी संबंधित प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र सहकार संकुलात समाविष्ट करुन ही सर्व कार्यालये एका छताखाली आणुन सहकार विभागाची मुख्य प्रशासकीय इमारत बांधण्याचा मार्ग या माध्यमातुन मोकळा झाला आहे. पालकमंत्री म्हणुन ना. अजितदादा पवार यांच्या कार्यकाळात बीड शहराच्या वैभवात भर घालणारी शासकीय वास्तु जिल्हायाच्या ठिकाणी उभारत असल्याचे समाधान आ. विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केले आहे.

## उपसभापती डॉ....

अँड. संगिताताई चव्हाण यांची आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची आज अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली. या वेळी डॉ. निलमताई गोऱ्हे यांना जिल्हाशल्यचिकित्सक डॉ. नागेश चव्हाण यांनी अँड. संगिताताई चव्हाण यांच्यावर आणि त्यांचे सहकारी फर्जना शेख व विशाल गणोरकर यांच्यावर चालू असलेल्या उपचारासंबंधी आणि तब्येतीची माहिती दिली. अँड. संगिताताई चव्हाण आणि सहकाऱ्यांवर चालू असलेल्या उपचारांवर डॉ. निलमताई गोऱ्हे यांनी समाधान व्यक्त केले.

## राज्यातील बड्या...

शाखोचे अपर पोलिस आयुक्त शेलेश बलकवडे यांची मुंबई गुन्हे शाखेच्या अपर पोलिस आयुक्तपदी बदली. अनिल पारसकर यांची अपर पोलीस आयुक्त, संरक्षण व सुरक्षा, बृहन्मुंबई येथे बदली झाली आहे. एम. रामकुमार यांची संचालक, महाराष्ट्र राज्य गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे येथे बदली झाली. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, बृहन्मुंबई येथे शशीकुमार मीना यांची बदली. प्रविण पाटील यांची नागपूर येथे अपर पोलिस आयुक्त म्हणून बदली झाली आहे. संजय बी. पाटील यांची अपर पोलिस आयुक्त पुणे येथे बदली झाली. वसंत परदेशी यांची अपर पोलीस आयुक्त, नागपूर शहर येथे बदली झाली. एस.डी. आव्हाड यांची अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड येथे बदली करण्यात आली आहे. एस. टी. राठोड यांचीपोलीस उप महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क येथे बदली झाली आहे. पी.पी. शेवाळे पोलीस उप महानिरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक, मुंबई येथे बदली झाली. विनिता साहु यांची अपर पोलीस आयुक्त, सशस्त्र पोलीस दल येथे बदली झाली. पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांची पुणे अपर पोलिस आयुक्त म्हणून बदली. प्रसाद अक्कनवरु यांची पोलीस उप महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई बदली. अमोघ गावकर यांची पोलीस उप महानिरीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (प्रशासन), पुणे येथे बदली. जी. श्रीधर यांची पोलीस उप महानिरीक्षक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे बदली. मोक्षदा पाटील यांची पोलीस उप महानिरीक्षक रा. रा. पोलीस बल येथे बदली. राकेश कलासागर यांची पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई येथे बदली. प्रियंका नारनवरे यांची अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, बृहन्मुंबई येथे बदली. अरविंद साळवे यांची सहसंचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिक येथे बदली. सुरेश कुमार मेंगडे यांची मुख्य दक्षता अधिकारी, सिडको, नवी मुंबई येथे बदली. धनंजय कुलकर्णी यांची अपर पोलीस आयुक्त, विशेष शाखा, बृहन्मुंबई येथे बदली. विजय मगर यांची रार पोलीस उप महानिरीक्षक म्हणून बदली. राजेश बनसोडे यांची अपर पोलीस आयुक्त, पुणे शहर येथे बदली. विक्रम देशमाने यांची अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, बृहन्मुंबई येथे बदली. राजेंद्र दाभाडे यांची अपर पोलीस आयुक्त, नागपूर शहर येथे बदली.

## चेहरा आणि...

यांच्या जुळ्या मुली अनुष्का आणि तनुष्का यांनी यंदा दहावी इयत्तेची परीक्षा दिली. आष्टीच्या दत्त मंदिर परिसरात राहणाऱ्या या जुळ्या बहिणींना दहावी इयत्तेमध्ये ९६ टक्के गुण मिळाले आहेत. दहावी इयत्तेत एकसारखे गुण मिळाल्यामुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात या जुळ्या बहिणींची चर्चा आहे. एकत्र करायच्या अभ्यास : अनुष्का आणि तनुष्का देशपांडे या दोघी जुळ्या बहिणी अभ्यासात सुरुवातीपासूनच हुशार होत्या अशी माहिती त्यांच्या शिक्षकांनी दिली. तसेच दोघी बहिणींना नृत्याची सुद्धा आवड असून दोघीजणी शालेय उपक्रम आणि कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हायच्या. तसेच अनुष्का आणि तनुष्का या दोघी सतत ऐकत्र अभ्यास करायच्या, एकमेकींच्या शंकांचे निरसन करायच्या, तसेच शाळेत सुद्धा सोबतच जायच्या. एक सारखे गुण मिळतील अशी अपेक्षा नव्हती : जुळ्या मुलींना परीक्षेत घवघवीत यश मिळाल्यामुळे देशपांडे कुटुंबाने त्यांच्या यशाचा आनंद साजरा केला. निकाल जाहीर झाल्यावर सेम टू सेम गुण पाहून बहिणींचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. 'एकसारखे गुण मिळतील असं वाटलं नव्हतं, पण निकाल लागल्यावर खूप आनंद झाला', अशी प्रतिक्रिया अनुष्का देशपांडे हिनं दिली.

## केज मध्ये...

या दुर्घटनेत मोठा अनर्थ टळला आहे.

सदर कंटेनर अनेक वाहनांना धडक देऊन अंबाजोगाईकडे येत असताना वाटेत त्याने चंदन सावरगाव नजिक आणख वाहन चालकास चिरडले असून या दुर्घटनेची माहिती मिळताच युसुफ वडगाव पोलीस स्टेशनच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी रोडवर येऊन सदर कंटेनरचा पाठलाग सुरू केला असता हा कंटेनर लोखंडी सावरगाव येथे पलटी झाला असून केज पान पाठलाग केलेल्या संतप्त जमावाने नंतर हा कंटेनर पेटवून दिल्याची माहिती आहे.

## बरसत्या पावसात...

रस्ता खुला केला . सुंदर हरिबा धापसे , पांडुरंग सुंदर धापसे यांना गेली चार वर्ष शेतात जाण्यासाठी रस्ता नव्हता . मंडळ अधिकारी वंदना विघ्ने यांनी अंगद बाबासाहेब खांडे व इतर यांना विश्वासात घेत बांधावरील रस्ता खुला केला . यावेळी पोलीस प्रशासनातर्फे हवालदार मनिषा केदार , श्री धोंडे उपस्थित होते . या रस्त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी जाणे सुलभ झाले असून त्यांच्या दैनंदिन कामांमध्ये मोठा दिलासा मिळाला आहे . पावसामुळे रस्ता बंद झाल्याने शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी मोठी अडचण निर्माण झाली होती . मात्र , स्थानिक प्रशासनाने दाखवलेली तत्परता व संवेदनशीलता यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे . शुक्रवारी अशाच प्रकारे पारगाव शिरस येथे पारगाव शिरस व शहाबाजपूर गावचा सुमारे दीड किलोमीटर शिवरस्ता मोकळा करण्यात आला . हा अडवलेला शिवरस्ता सामोपचाराने खुला करून देताना मंडळाधिकारी स्मिता गुंजाळ शेळके , ग्राम महसूल अधिकारी विजय बहिर सरपंच दिनकर जमदाडे यांनी कौशल्य पणाला लावले . हा रस्ता सुमारे ६० शेतकऱ्यांना उपयोगी पडणार आहे . यावेळी रामकिसन वाटमोडे , मगन कणसे , अरूण कणसे , बळीराम शेंडगे , विश्वम्बर कणसे , राजाभाऊ कणसे , देवीदास उबाळे , विठ्ठल कणसे , त्रिंबक रसाळ , जालींदर कणसे , लहू कणसे , नारायण कणसे , बबन टेकवले , सूदाम कणसे , तिर्थराज रसाळ , रामभाऊ रसाळ , बाळू कणसे , गंगाराम रसाळ उपस्थित होते .

असाच एक रस्ता बेलुरा येथे शुक्रवारी मोकळा करण्यात आला . येथील गट नंबर १३५ व ११८ गाडी रस्त्याच्या तक्रार अर्जानुसार अर्जदार देवजी गवते विरुद्ध गैरअर्जदार श्रीमंत साहेबराव गवते यांचा पानंद रस्ते खुला करण्यात आला . आपसात समेट घडवून आणून या ठिकाणचा रस्ता दोघांच्या संमतीने / तडजोडीने खुला करण्यात आला . या वेळी मंडळ अधिकारी प्रभू येवले , ग्राम महसूल अधिकारी उत्तरेश्वर खांडे व गावकरी उपस्थित होते .

तालुक्यात अशा प्रकारे रस्ते खुले होत असल्याने शेतकऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानत हा उपक्रम गरजूंसाठी संजीवनी ठरत असल्याचे सांगितले . मागील सहा महिन्यात सुमारे ५० किलोमीटर रस्ते मोकळे झाल्याचे नायब तहसीलदार सुहास हजारे यांनी सांगितले .जनतेमध्ये प्रशासनाविषयी विश्वास वाढत असून हा उपक्रम इतर ठिकाणीही राबवावा , अशी मागणी होत आहे . पावसामुळे रस्ते बंद झाल्याने शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी मोठी अडचण निर्माण झाली होती . मात्र , स्थानिक प्रशासनाने दाखवलेली तत्परता व संवेदनशीलता यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे . तालुक्यातील शेतकऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानत हा उपक्रम गरजूंसाठी संजीवनी ठरत असल्याचे सांगितले . या कार्यवाहीमुळे जनतेमध्ये प्रशासनाविषयी विश्वास वाढत असून हा उपक्रम इतर ठिकाणीही राबवावा , अशी मागणी होत आहे .

## खोलेश्वर विद्यालयाचा...

पेक्षा जास्त गुण घेतले. उर्वरित ४५ विद्यार्थी ७०% च्या पुढे गुण घेत घवघवीत यश संपादन या बाबत खोलेश्वर विद्यालयाच्या वतीने अध्यक्ष दिलीप पारेकर, प्राचार्या सरिता फपाळ, मुख्याध्यापक संजय रायते यांच्यासह सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# आमदारांनी स्टंट करू नये, नाळवंडीप्रमाणे राजुरीतील बोगसगिरीची चौकशी करणार का ?



## नाळवंडीचे सरपंच ॲड.राजेंद्र राऊत यांचा सवाल; आमदारांच्या कामांचे 'पोस्टमार्टम' करू

**बीड । प्रतिनिधी**

बीड मतदारसंघात नरेगा अंतर्गत झालेल्या कामांची आमदार संदीप क्षीरसागर यांनी पाहणी केल्यानंतर नाळवंडीचे सरपंच ॲड.राजेंद्र राऊत यांनी आपणही आमदारांच्या कामांचे 'पोस्टमार्टम' करू शकतो, असा इशारा दिला आहे. नाळवंडीमध्ये अचानक पाहणी करून स्टंटबाजी केली जाते, पण नवगण राजुरीसारख्या गावांमध्ये झालेल्या मोठ्या गैरव्यवहारांचीही चौकशी आमदार करणार आहेत का? असा थेट सवाल करत ॲड.राऊत यांनी आमदारांनी स्टंटबाजी थांबवावी, असे म्हटले आहे.

नाळवंडी ग्रामपंचायतीने नरेगा अंतर्गत नियमांचे पालन करत कामे केली असून, संबंधित कामांची यापूर्वीच चौकशी झाली आहे, समितीचे अहवाल पाहूनच बिले अदा केली आहेत, आताही रस्ते लोकांच्या वापरात आहेत, कोणत्याही ग्रामस्थाची तक्रार नाही, असे ॲड.राऊत यांनी स्पष्ट केले. सदरील कामांवर आमदारांनी जाऊन केवळ फोटोसेशन केले. ते सध्या काही निवडक गावांमध्येच लक्ष केंद्रित करत असून, त्यांनी शिफारस केलेल्या कामांची चौकशी होईल का? त्यांच्या स्वतःच्या गावामध्ये झालेल्या बोगसगिरीची चौकशी लावतील का? असे सवाल ॲड.राऊत यांनी उपस्थित केले आहेत. जर आमदारांना खरंच भ्रष्टाचारविरोधी लढा द्यायचा असेल, तर मग नवगण राजुरीसारख्या स्वतःच्या आणि निकटवर्तीय पदाधिकाऱ्यांच्या गावांमध्ये झालेल्या बोगस कामांचीही पाहणी करून वस्तुस्थिती मांडावी. निवडणुकीच्या तोंडावर निवडक गावांमध्ये जाऊन स्टंट करून जनतेची दिशाभूल करणे थांबवावे. शासनाच्या निधीचा अपव्यय कोठे झाला असेल, तर संबंधितांवर कारवाई व्हावी, याला आमचाही पाठिंबा आहे. पण कारवाई ही निवडक नसून सर्वसमावेशक असली पाहिजे, अशी भूमिका सरपंच ॲड. राजेंद्र राऊत यांनी मांडली. न्याय हवा असेल, तर तो सर्व गावांना सारखाच मिळाला पाहिजे, असा ठाम इशारा ॲ ड.राजेंद्र राऊत यांनी दिला आहे.

### बीडचे आमदार बीड ते नाळवंडी रस्त्याचा प्रश्न कधी सोडविणार?

**बीड तालुक्यातील बीड ते नाळवंडी हा रस्त्याचा प्रश्न ज्वलंत आहे. आमदारकीच्या संपूर्ण कार्यकाळात आमदारांनी या रस्त्याविषयी तोंडातून ब्र शब्द काढला नाही. परंतु लोकांच्या उपयोगात येत असलेल्या गावांतर्गत रस्त्यांची चौकशी लावण्याचा खटाटोप त्यांनी सुरू केला. आहे. चौकशीमध्ये वारंवार तोंडावर पडल्यानंतरही आमदारांकडून स्टंट थांबविला जात नाही, असे ॲड.राऊत यांनी म्हटले आहे.**

### हिंमत असेल तर नाळवंडीतील जलजीवनच्या कामाची चौकशी करा!

**नाळवंडीतील जल जीवन मिशन योजनेअंतर्गत होत असलेले काम दोन वर्षांपासून संथगतीने सुरू आहे. त्याचा गावातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होत असून ग्रामस्थांना सध्याही पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. या कामात आमदारांचे समर्थक सहभागी असल्याने चौकशी लावली जात नाही. हिंमत असेल तर या कामाची चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, असा इशारा ॲड.राजेंद्र राऊत यांनी दिला आहे**

# गुणवत्तेचं खणखणीत नाणं, धोंडराई जिल्हा परिषद शाळा हेंच अस्सल सोनं!

**गेवराई । प्रतिनिधी**

दहावीच्या ऑनलाइन निकालानंतर चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या मुलांचे -मुलींचे शिक्षक आणि पालकांकडून कौतुक सुरू आहे. यश मिळवलेल्या मुलांच्या कुटुंबामध्ये आनंद साजरा होत आहे. तर दुसरीकडे धोंडराई जिल्हा परिषद शाळेच्या एका मुलीने चक्क ९४.०० टक्के गुण मिळवून लक्ष वेधून घेतले आहे.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत गेवराई तालुक्यातील धोंडराई गावाच्या जिल्हा परिषद माध्यमिक शाळा प्रशालेचा ९६.२० लागला असूनसर्व प्रथम कु. ठोंबरे आरती बळीराम.९४.००%, द्वितीय क्रमांक कु. जाधव साधना भगवान ९३.८०%,तृतीय क्रमांक-कु. जायगुडे साक्षी राम

९२.६०%,चतुर्थ कु .निकम गौरी संदिप -९२.२०% गुण घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपली यशस्वी गुणवत्ता गाजवल्यानंतर यंदाही आपली दैदिप्यमान यशाची परंपरा अबाधित राखत, उत्तुंग यश संपादित केले आहे. शालांत परीक्षेत उत्तीर्ण निकालामध्ये सातत्य राखण्यासाठी शाळा




यशस्वी झाली असून गेवराई तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात आपल्या गुणवत्तेच्या जोरावर जिल्हा परिषद शाळेने एक वेगळी ओळख निर्माण केली असून गुणवंताची खान म्हणून या ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेकडे भविष्यात पाहिले जाईल असे मत मुख्याध्यापक श्री .गणेश शहाणे यांनी व्यक्त केले आहे तसेच प्रथम आलेल्या आरती ठोंबरे या अभ्यासात हुशार असल्यामुळे शाळेतदेखील तिची चुणूक दिसत होती. दहावीचा अभ्यास करण्यासाठी तिने स्वतः नियोजन केले. चांगला अभ्यास केला. अखेर या परीक्षेत शाळेतून पहिली येण्याचा मान मिळवला. ९४.०० टक्के मिळवून ती विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाली आहे. शाळेतील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक गणेश शहाणे यांनी अभिनंदन केले असून जिल्हा परिषद शाळेतील उत्कृष्टरित्या निकालाची परंपरा कायम राखत यावर्षी यश मिळवल्याबद्दल शाळेच्या गुणवत्तेच्या बाबतीत समाधान व्यक्त केले जात आहे.

# आरोग्यसेवेत उत्कृष्ट योगदानासाठी श्रीमती रमा गिरी यांचा राज्यपातळीवर सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

कोल्हापूर येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या राज्यस्तरीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार सोहळ्यात बीड जिल्हा रुग्णालयाच्या आधीसेविका श्रीमती रमा गोविंदराव गिरी यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांनी केलेल्या ७००० हून अधिक सुरक्षित प्रसूती, परिचारिकांच्या शैक्षणिक विकासासाठी केलेले सततचे प्रयत्न आणि कोविड काळात कोविडग्रस्त रुग्णांवर केलेले उपचार यांसारख्या कार्यांमुळे त्यांना राज्याचा प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री माननीय नामदार श्री प्रकाश आबिटकर आणि कोल्हापूरचे खासदार माननीय श्री धैर्यशील माने यांच्या हस्ते १२ मे २०२५ रोजी कोल्हापूर येथील राज्यश्री शाहू छत्रपती स्मारक भवनात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी बोलताना मान्यवरांनी श्रीमती रमा गिरी यांच्या समर्पित भावनेची आणि रुग्णांप्रति असलेल्या त्यांच्या कटिबद्धतेची प्रशंसा केली. डॉ. नितीन अंबाडेकर, संचालक मुंबई.



डॉ. विजय कंदेवाड, संचालक पुणे. डॉ. पुरुषोत्तम मडावी आणि डॉ. नीलिमा सोनवणे सहाय्यक संचालक मुंबई मा. जोशी सर मुख्य कार्यकारी अधिकारी कोल्हापूर डॉ. दिलीप माने उपसंचालक डॉ. पिंपळे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ श्रीमती सुप्रिया देशमुख जिल्हा शल्य चिकित्सक व एन एच एम प्रमुख श्रीमती कांबळे कोल्हापूर यांच्यासह आरोग्य विभागातील अनेक वरिष्ठ अधिकारी आणि विविध जिल्ह्यांचे पुरस्कारप्राप्त कर्मचारी या सोहळ्यास उपस्थित होते. श्रीमती रमा गिरी यांचे सामाजिक कार्यही प्रेरणादायी असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# दहावी बोर्ड परीक्षेत बियाणी डिजिटल स्मार्ट कोचिंगच्या विद्यार्थ्यांचे नेत्रदीपक यश

**बीड । प्रतिनिधी**

यावर्षी झालेल्या दहावीच्या बोर्ड परीक्षेत बियाणी डिजिटल स्मार्ट कोचिंगच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. यावर्षीच्या दहावीच्या परीक्षेत क्लासचे १११ विद्यार्थी बसले होते. दरवर्षी प्रमाणे १०० % निकालाची परंपरा कायम ठेवत यातील तब्बल ९२ विद्यार्थी हे विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. यात २० विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत.

या परीक्षेत कृष्णा दाणी ९७.६, सार्थक चव्हाण ९५.२, पूर्वा लड्डा ९३.६, गौरी कुलकर्णी ९३.४, श्रुती कोरडे ९३, गौरी सोनी ९२.४, श्वेता गुळजकर ९२, आदर्श बुंदिले ९२, प्राप्ती कांबळे ९२, श्रुती सुतार ९२, वैभवी कोरे ९१.२, शरद शेंडगे ९१, साई भागवत ९०.०८, योगीराज गोरे ९०.०८, जयेश कदम ९०.४, संबोधी सोनवणे ९०.४, ओंकार इगडे ९०.२, शिवराज जवळकर ९०, पृथ्वीराज घुमरे ९०, ओम कासट ९०, नेहा सोनवणे ८९, समीक्षा रांजणकर ८९,मधुरा पाथरकर ८८.६, आर्या कासट ८८.४, अवंती गवळी ८८.४, निकिता डोळस ८८.४, धनश्री तावरे ८७.२, प्रणाली मंत्री ८७, पठाण सलमान ८७, विराज कुलकर्णी ८७, केशव बांगड ८७, ऋषिकेश सोन्ने ८७, अमृता मरकड ८७, रक्षा संगा ८७.०४, दर्श मांडे ८६, रोहन देटे ८६, गायत्री सवासे ८६, कुणाल धोरमारे ८५.४, भव्य जैन ८५.४, रुचिता परहाड ८५, खुश जाजू ८५, यश मोरे ८५ या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. विद्यार्थ्यांना शालेय तसेच स्पर्धा परीक्षेचे योग्य मार्गदर्शन मागील ९ वर्षांपासून बियाणी डिजिटल स्मार्ट कोचिंगच्या माध्यमातून केले जात आहे. येथील विद्यार्थी आज विविध क्षेत्रात त्यांचे नाव गाजवत आहेत. क्लासच्या नाविन्यपूर्ण शैक्षणिक प्रणालीचा विद्यार्थ्यांना फायदा झाल्याचे मनोगत पालकांनी व्यक्त केले. तसेच या मार्गदर्शनामुळे ३० विद्यार्थ्यांना विज्ञान विषयात ९० पेक्षा जास्त आणि १९ विद्यार्थांना गणित विषयात ९० पेक्षा जास्त गुण मिळाल्याचे मनोगत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. या यशामुळे विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# ९०.४० % गुण मिळवत मानसी सचिन शहागडकर हिचे दहावीत घवघवीत यश



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (डडउ) परीक्षेत बीड येथील संस्कार विद्यालयाची विद्यार्थिनी कु. मानसी सचिन शहागडकर हिने ९०.४० % गुण मिळवत प्रथम येवून घवघवीत यश संपादन केले आहे.मानसी च्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून तिचे कौतुक होत आहे. ती लहानपणापासूनच अभ्यासात अत्यंत हुशार असून तिने विविध शिकवणी मध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तिच्या या यशामागे तिची चिकाटी, मेहनत, पालकांचे मार्गदर्शन व शिक्षकांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगण्यात येत आहे.जयदत्त आणा शीरसागर, अनीलदादा जगताप, राजेंद्र मस्के, सर्जराव तांदळे, नवनाथ आणा शिराळे,प्रोफेशनल क्लासेस चेरमन अध्यक्ष पवार सर यांच्या सह शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोहर धोंडे यांनी मानसी चे अभिनंदन करून तीला पुढील शैक्षणिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या तर संस्कार विदयालयचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंदांनी मानसी चे अभिनंदन करत तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे दहावीच्या बोर्ड परीक्षेत घवघवीत यश





**कडा । प्रतिनिधी**

कडा येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूल या सी. बी. एस. ई. बोर्ड मान्यताप्राप्त शाळेचा १००% निकाल लागला असून शाळेतील प्रणव कासवा - ९५.४०% प्रथम क्रमांक , शर्विल भळगट - ९५.२०% द्वितीय क्रमांक, आयुष मुनोत - ९४.२०% तृतीय क्रमांक मिळवला आहे. त्याचबरोबर १३ विद्यार्थ्यांनी ८० % पेक्षा जास्त गुण संपादन करून विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष- श्री.अमितजी राठोड, उपाध्यक्ष - श्री. संदीपजी चानोदिया, सचिव - श्री. हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष - डॉ. प्रमोदजी भळगट तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी श्री.मनीषजी गांधी, श्री. प्रकाशजी श्रीश्रीमाळ, श्री. अमोलजी पटवा,श्री संजयजी पितळे, श्री.संतोषजी गांधी, मुख्याध्यापक - के. अभिलाष , सल्लागार - पी.जी. मेहेर सर , सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, पालकवर्ग यांच्यासह शिक्षणप्रेमी नागरिकांनी अभिनंदन केले.

# आर्यन व अर्जुन थिगळे चे दहावीच्या परीक्षेत यश

**बीड । प्रतिनिधी**

येथील संस्कार विद्यालयाचे विद्यार्थी आर्यन थिगळे, अर्जुन थिगळे या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळविले आहे. संस्कार विद्यालय, बीड या शाळेचे विद्यार्थी थिगळे अर्जुन नितीन या विद्यार्थ्याने मराठी विषयात ९१, संस्कृत ९८, इंग्रजी ९४, गणित ८८, विज्ञान ८८, सामाजिकशास्त्रे ९६ असे एकूण ९५.८०% गुण मिळविले तर थिगळे आर्यन नितीन या विद्यार्थ्याने मराठी विषयात ९०, संस्कृत १००, इंग्रजी ८८, गणित ९६, विज्ञान ८८,



सामाजिकशास्त्रे ९१ असे एकूण ९६% गुण मिळविले. या थिगळे बंधूंनी दहावीच्या परीक्षेत मिळविलेल्या घवघवीत यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतूक होत आहे.

# तलवार बाळगल्याच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता : ॲड.सचिन काळे

**बीड । प्रतिनिधी**

तलवार बाळगल्याच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता थोडक्यात माहिती अशी की दिनांक ३०/०६/ २०२० रोजी दुपारी एक वाजता सुमारास पोलीस कर्मचारी पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की इसम नामे आकाश उर्फ तानाजी शिवाजी वरवट राहणार रामतीर्थ नाका पेठ बीड हा लोकांना धाक दाखवन्याच्या उद्देशाने रामतीर्थ नाक येथे तलवार बाळगून दहशत निर्माण करत आहे. त्याच्या कडे तलवार असून तो रामतीर्थ नाका परिसरात फिरत आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावर सदर पोलिसांनी वरिष्ठअधिकाऱ्यांच्या



मार्गदर्शना खाली दोन पंचांना घेऊन बातमीचा उदेश समजावून सांगुन रामतीर्थ नाका बीड येथे सुमारे दीड वाजता छापा मारला असता रामतीर्थ येथील चौकात तानाजी उर्फ आकाश वरवट हा रामतीर्थ नाक चौक येथे तलवार बाळगून दहशत निर्माण करत होता त्यास पकडून ताब्यात घेतले व दोन पंचा समक्ष अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एका तलवार मिळून आली. लालसर रंगाची लाकडी पुठ्ठ्याची तिची लांबी २८ इंच असून म्याना च्या समोरील बाजूस पितळी पत्रा आहे सदरील म्यान काढुन पाहताच तिचे पात्याची लांबी २७ इंच आहे अशी असलेली जुनी वापरतील तलवार मिळून आली त्या नुसार पोलिसांनी आरोपी तानाजी उर्फ आकाश वरवट याला पोलीस स्टेशन पेठ बीड येथे घेऊन जाऊन त्याचे विरोधात गु.र.नं १७३/२०२० नुसार गुन्हा दाखल केला. त्यास कलम ४/३५ शस्त्र अधिनियम दाखल केले व त्यानंतर पोलिसांन सदरील गुन्ह्यात तपास करून दोषारोप पत्र मा. न्यायालयात दाखल केले. दोषारोपपत्रास आर.सी.सी.क्र २३६/२०२० असा दाखल झाला होता. फिर्यादी पक्षामार्फत ५ साक्षीदार तपासण्यात आले साक्षीदारांची साक्ष आरोपीविरुद्ध आरोप सिद्ध करूशकले नाही व आरोपीचे वकील ॲड. सचिन काळे यांनी घेतलेला बचाव व सबळ पुराव्या आधारे आरोपीस मा. प्रथमवर्ग न्यायदंधादिकारी साहेब बीड यांनी आरोपीची निर्दोष मुक्त केली. आरोपीच्या वतीने ॲड.सचिन काळे यांनी काम पहिले.


## जाहीर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात बीड, ता. जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८२०/२०२५**

CNR No. MHBI020016672025

**मिरा वि. निरंक**

अर्जदार :१. मिरा भ्र. गिन्यानदेव राठोड वय- ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. लक्ष्मीआई तांडा, नाळवंडी ता. जि. बीड, २. संकेत पि. गिन्यानदेव राठोड वय- १८ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. लक्ष्मीआई तांडा, नाळवंडी ता. जि. बीड, ३. राधाबाई भ्र. गोवर्धन राठोड वय - ७५ वर्षे, धंदा - घरकाम, रा. लक्ष्मीआई तांडा, नाळवंडी ता. जि. बीड, ४. गोवर्धन पि. लक्ष्मण राठोड वय- ७६ वर्षे, धंदा - शेती, रा. लक्ष्मीआई वांडा, नाळवंडी ता. जि. बीड

विरुध्द निरंक

**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.**

वरील अर्जदार क. १ ते ४ यांनी या न्यायालयात मयत गिन्यानदेव गोवर्धन राठोड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत गिन्यानदेव गोवर्धन राठोड यांचा मृत्यु दिनांक २०/१०/२०१४ रोजी लक्ष्मीआई तांडा, नाळवंडी ता. जि. बीड येथे त्यांचा मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ ही मयाताची पत्नी असून अर्जदार क. २ हा मुलगा आहे. अर्जदार कं. ३ ही आई आहे. तसेच अर्जदार कं. ४ हे मयताचे वडील आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत गिन्यानदेव गोवर्धन राठोड यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन दैनिक मराठवाडा पत्र मध्ये प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर गुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदार हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख १३/०६/२०२५. आज दिनांक १६ माहे मे २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**(मार्फत- ॲड. टेकाडे वाय. एस.)**

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का** **(स्वाक्षरीत)**

**क.लिपीक** **अधीक्षक**


**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

CMYK

दैनिक **मराठवाडा पत्र**

● epaper.marathwadapatra.com

शनिवार, दि.१७ मे २०२५ पान ४



क्षितिजावरची निसर्ग रंगपंचमी (छाया : विजयकुमार हरिचंद्रे)

# आईस्क्रीम विक्रेत्याला मारहाण करत पोटाला पिस्टल लावून दारु साठी 4 हजार, 900 रु घेतले

## माजलगाव शहरात गुंडा राज?

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या छत्रपती संभाजी महाराज चौकातील एका आईस्क्रीम विक्रेत्याला जीवे मारण्याची धमकी देऊन त्याच्या पोटाला पिस्टल लावून दारु प्यायला त्याच्या फोन पे द्वारे आरोपीने स्वतः च्या फोन पे वर ४हजार, ९००रु घेऊन मारहाण करुन जखमी केल्याची घटना घडली. प्रकरणी पिडीत फिर्यादी योगेश अर्जुन तौर रा.छत्रपती नगर, माजलगाव याने १४मे रोजीच्या पहाटे १:२८वा शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी नुसार ३०एप्रिल २०२५रोजी प्रकरणातील आरोपी नामे तात्यासाहेब जाधव (पुर्ण नाव पत्ता नाहि) याने फिर्यादी योगेश तौर च्या आईस्क्रीम गाड्यावर नौकर बबलु माने याला चापटाने मारहाण केली होती व आरोपी नामे जालिंदर काशीनाथ गायकवाड रा केसापुरी कॅम्प,ता.माजलगाव याने फिर्यादीस धमकी दिली होती की, जावयाचा मोबाईल फुटला आहे नवीन मोबाईल घेऊन दे नसता आईस्क्रीमचा गाडा चालवु नको. यानंतर १३मे रोजीच्या सांयकाळी ६:४५वा छत्रपती संभाजी महाराज चौकातील स्वागत खानावळ च्या बाजुला आईस्क्रीम विक्री करत असताना आरोपी नामे संतोष उत्तम गायकवाड रा केसापुरी कॅम्प,ता.माजलगाव हा दोन अन ओळखी आरोपींला घेऊन मोटारसायकल वर आला.आणि योगेश तौर ला म्हणाले की, त्यांच्या दाजीला का मारले तेवढ्यातच संतोष गायकवाड याने त्याच्या जवळ असलेला पिस्टल योगेश च्या पोटाला लावून म्हणाला की, दारु प्यायला पैसे दे नसता मारुन टाकीन. यानंतर त्याने योगेश च्या मोबाईल फोन पे वरुन ४हजार, ९००रु त्याच्या फोन पे वर घेतले व लाथाबुक्क्यांनी मारहाण करत वायफरच्या स्टील पाईप,बैनर च्या लोखंडी फ्रेम ने पाठी,पायावर मारुन जखमी केले. अशा आश्याच्या फिर्याद वरुन नमुद नामे ३व अन ओळखी २आरोपीं विरोधात भान्यासं -२०२३चे कलम ११९(१), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) सह भारतीय शस्त्राबंदी कायद्याच्या कलम ३, २५अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असुन पुढिल तपास पोउपनि राठोड करत आहेत.



धर्मवीर,स्वराज्य रक्षक,छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त खा.बजरंग सोनवणे,आ. सदीप क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी अभिवादन केले, यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शंभूप्रमे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपा मंत्री विजय शहावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा : गणेश बजगुडे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

ज्या पाकिस्तानी अतिरेक्यांनी काश्मिरच्या पहेलगाम भागात निष्पाप भारतीयांवर हल्ला केला त्यात अनेक निष्पाप पर्यटकांना आपला जीव गमावावा लागला. त्याचा बदला म्हणून भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंधूर राबवत कर्नल सोफिया कुरैशी व पायलट व्योमिका सिंह यांनी पाकिस्तानातील दहशतवाद्यादी तळावर हवाई हल्ले करून दहशतवाद्यांचे समुळ नष्ट केले. अशा जाबाज सैनिकांच्या पराक्रम, शौर्याचे संपुर्ण भारतवासी कौतुक करत असताना मध्ये प्रदेश सरकार मधील भाजपा मंत्री विजय शहा यांनी आम्ही अतिरेक्यांना मारायला त्यांचीच बहिण पाठवली म्हणत अतिशय



बेताल व संतापजनक वक्तव्य करून भारतीय सैनिकांचा अवमान केलेला आहे.

कर्नल सोफिया कुरेशी या भारतीय असुन तमाम भारतीयांच्या त्या बहीण आहेत. परंतु त्या मुस्लिम आहेत म्हणुन त्यांना आतंकवादयाची बहीण म्हणणे हे अतिशय निंदनीय व खेदजनक आहे. या वक्तव्याचा बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करत अश्याप्रकरे बेताल वक्तव्य करणाऱ्या भाजपा मंत्री विजय शहावर देश द्रोहाचा गुन्हा दाखल करुन मंत्री मंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी काँग्रेसचे नेते तथा शिवक्रांती युवा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष गणेश दादा बजगुडे यांनी केले आहे.

# वडवणी येथील,आयुष्यमान आरोग्य मंदिरामध्ये राष्ट्रीय डेंग्यू दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम १६ मे राष्ट्रीय डेंग्यू दिन जिल्हा हिवताप कार्यालय, बीड यांच्यावतीने वडवणी येथील,आयुष्यमान आरोग्य मंदिरामध्ये शुक्रवार दि.१६ मे २०२५ रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम संपन्न. याबाबत अधिक माहिती अशी की, लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी दरवर्षी १६ मे रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा केला जातो या दिवशी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करून डेंग्यू आजार कशामुळे होतो

पावसाळ्यामध्ये या आजाराचं प्रमाण का जास्त असते प्रतिबंधात्मक उपाययोजना काय कराव्यात ज्यामुळे हा आजार होणार नाही याची माहिती देण्यासाठी कार्यक्रम आयोजित केले जातात या अनुषंगाने वडवणी येथील आयुष्यमान आरोग्य मंदिरामध्ये १६ मे राष्ट्रीय डेंग्यू दिन जनजागृती कार्यक्रम घेऊन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडवणी येथील,आयुष्यमान आरोग्य मंदिराचे वैद्यकीय अधिकारी डॉ. थटवले साहेब होते तर प्रमुख अतिथी व समुपदेशक म्हणून श्री. नागरे साहेब तसेच आरोग्य सेवक श्री.वाघे साहेब,आरोग्य सेवक गिरी सर,श्री.वारे सर,श्री डुकरे सर,श्रीमती गलधर मॅडम प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी,श्री.चोले सर लॅब असिस्टंट,परिचारिका उजसगरे मावशी यांच्यासह आयुष्यमान आरोग्य मंदिरांमधील सर्व कर्मचारी उपस्थित होते.



### डेंग्यूला हरविण्याचे उपाय करा.

**डेंगू ला आळा घालूया सर्वत्र जागरूकता पसरूया असे घोषवाक्यचे फलक दाखवून रुग्णालयातील रुग्णांची जनजागृती करून १६ मे राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने रुग्णालयातील कर्मचारी तसेच रुग्ण व त्यांचे नातेवाईक उपस्थित होते.**

**या कार्यक्रमांमध्ये रुग्णालयात आलेल्या रुग्ण व त्यांच्यासोबत असलेल्या नातेवाईकांना वेगवेगळे प्रात्यक्षिक दाखवून त्या ठिकाणी काढलेल्या रांगोळीद्वारे माहिती देण्यात आली एडिस,इजिप्ती हे डास चावल्यास डेंगू हा आजार होतो या डासांची निर्मिती पाणी साठवून राहिल्यास होते त्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून आपल्या घरासमोरचा परिसर स्वच्छ ठेवावा जसे की पाणी साठूनदेणे,टायर कुंड्या, बादल्या,कचरा,प्लास्टिक नारळाच्या करवंट्या,फुटलेल्या मातीच्या घागरी,नाले गटारी हे स्वच्छ कराव्यात तपासा, स्वच्छ करा आणि झाकून ठेवा:**

# बरसत्या पावसात महिला मंडळ अधिकाऱ्यांनी रस्ता केला मोकळा

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे लोकाभिमुख प्रशासन : तहसीलदार शेळके यांचेकडून माणुसकीचे दर्शन

**बीड । प्रतिनिधी**

सध्या राज्यात छत्रपती शिवाजी महाराज समाधान योजना राबविणे सुरु आहे . महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेत आहेत . छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्यामार्फत सस्ती अदालत राबविण्यात येत आहे . पूर्ण विभागात शिबीरे आयोजित करण्यात आली असून , ही शिबिरे ग्रामीण भागातील नागरिकांच्या



अडचणी तातडीने सोडवण्यासाठी उपयुक्त ठरत आहेत .

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने प्रभावी कामगिरी करत नागरिकांची तातडीने मदत करण्याचा चंग बांधला आहे . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचा शेतकऱ्यांचे रस्ते खुले करण्यावर खूप भर असतो . म्हाळसापूर येथील शेतकऱ्यांसाठी तहसीलदारांनी तातडीने निर्णय घेत मंडळ अधिकारी वंदना विघ्ने व तलाठी विलास शिंदे यांना रस्ता खुला करण्याचे निर्देश दिले . त्यांनीही गुरुवार १५ मे रोजी भर पावसात तातडीने कारवाई करत अनेक दिवसांपासून बंद असलेला शेत

▶▶ उर्वरित पान २ वर



बीड :अमोल धोंगडे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना गिरीश देशपांडे समवेत दत्तात्रय माटे, श्रीराम कुऱ्हे, सतीश बहीर, शिवाजी पाटोळे सुभाष सोनवणेआदि.

## दहावीत भक्ती लाडला मिळाले १०० टक्के

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील सेंट अँथनी इंग्लिश स्कूल, अंबाजोगाई येथील इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थिनी भक्ती बालासाहेब लाड हिने इयत्ता दहावीच्या परीक्षेमध्ये १०० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. भक्तीने गणित आणि संस्कृत या विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण मिळवले असून, कला क्षेत्रातील गायन विषयातील प्राविण्याबद्दल अतिरिक्त गुण मिळाल्यामुळे तिचे एकूण गुण १०० टक्के झाले आहेत. तिच्या या उत्तुंग यशाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.



## गारपीट, अवकाळी पावसामुळे कुटेवाडी येथे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान



**बीड । प्रतिनिधी**

मौजे कुटेवाडी येथील कांदा उत्पादक १० ते १५ शेतकऱ्यांच्या उभ्या पिकाचे आजच्या अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे.. या ठिकाणी धनंजय गुंदेकर यांनी भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. पूर्ण वाढ झालेल्या कांद्यांना गोळा करण्यात आलेले होते.. तेवढ्यात आलेल्या वादळी वारे, गारपीट अन् पावसामुळे हे नुकसान झाले.. प्रशासनाने याबाबत पंचनामा करण्यात यावा अशी मागणी संचालक धनंजय गुंदेकर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# खोलेश्वर विद्यालयाचा इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा शंभर टक्के निकाल

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

मिजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालयाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी केलेल्या मेहनतीने निकालात गुणवत्तेची यशस्वी वाटचाल होत आहे. यावर्षी दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. या विद्यालयातून एकूण १२० विद्यार्थी बसले होते. पैकी ७५ विद्यार्थ्यांनी ९०% च्या पुढे मार्क घेतले. संचिता मदन कदम व सिद्धी श्याम पामे या विद्यार्थिनींनी ९८.६०% घेत दिंद्रुड केंद्रातुन प्रथम येण्याचा मान पटकावला. अनुज अच्युतराव कदम व अथर्व देवेंद्र वडकर या विद्यार्थ्यांनी ९८.२०% गुण घेत केंद्रातुन द्वितीय क्रमांक पटकावला. श्रुती अनंत होरमाळे यशराज गणेश उढाण या विद्यार्थ्यांनी ९७.८०% मार्क घेत केंद्रातून तृतीय क्रमांक मिळवला. पारेकर हर्षवर्धन विलास ९६.८०%, खोलेश्वर विद्यालयाचे ७५ विद्यार्थी ९० % गुण घेत शाळेतून ए+ गुणवत्तेने उत्तीर्ण झाले. यात २८ विद्यार्थ्यांनी ९५%




▶▶ उर्वरित पान २ वर

